**कालमर्यादीत**

सत्यमेव जयते

**राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष**
**राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान**
**(महाराष्ट्र राज्य)**

---

जा.क्र /रा.गां.पं.स.अ./प्रशि./७२६/२०१६ — दि. १२ मे, २०१६

प्रति,

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद, (सर्व)**

**विषय - 'आमचं गाव आमचा विकास' अंतर्गत प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रम...**

**संदर्भ - ग्राम विकास विभागाकडील पत्र क्र.जीपीडीपी-२०१६/प्र.क्र.२/पं.रा.६, दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१६ व १० मे, २०१६**

'आमचं गाव आमचा विकास' या उपक्रमांतर्गत प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रमांसाठी शासनाच्या उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये मान्यता दिलेली असून या उपक्रमांतर्गत विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे लक्ष घटक व प्रशिक्षण कार्यक्रम संख्या निश्चितीसाठी आपल्याकडून सविस्तर माहिती मागविणेत आली होती. आपण या कार्यालयाकडे सादर केलेल्या माहितीच्या आधारे आपल्या जिल्ह्यातील प्रशिक्षण लक्ष घटक व बैठका तसेच प्रशिक्षण कार्यशाळांची संख्या निश्चित करण्यात आली असून शासनाने मंजूर केलेल्या प्रशिक्षण दरांनुसार आपल्या जिल्ह्यातील कार्यशाळांची संख्या व आवश्यक निधी निश्चित करणेत आलेला आहे.

२. आपल्या जिल्ह्यासाठी निश्चित करणेत आलेल्या प्रशिक्षण कार्यक्रम व क्षमता बांधणी उपक्रमांची संख्या, निधी व सोबत जोडलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपल्या जिल्ह्यातील प्रक्रिया राबवायची आहे. सोबत जोडणेत आलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील अनुक्रमांक १ ते ५ मधील उपक्रम दिनांक १० जून २०१६ पूर्वी राबविणे आवश्यक आहे.

३.उर्वरीत अनुक्रमांक ६ व ७ मधील उपक्रम दिनांक २० जून, २०१६ पूर्वी पूर्ण करावयाचे आहेत.

४. अनुक्रमांक ६ व ७ मधील गण स्तरावरील कार्यशाळा पूर्ण होताच, त्या-त्या गणातील ग्रामपंचायतींमध्ये पुढील ३ दिवसांची लोकसहभागीय नियोजन प्रक्रिया, अनुक्रमांक ८ (अ), ८ (ब) व ८ (क) मधील मार्गदर्शक सूचना व निकषांनुसार तात्काळ सूरू करावयाची आहे. सदरची ३ दिवसीय लोकसहभागीय नियोजन प्रक्रिया आपल्या जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमार्फत राबवून, सर्व ग्रामपंचायतींचा ग्रामपंचायत विकास आराखडा १५ ऑगस्ट, २०१६ पर्यंत पूर्ण करावयाचा आहे. ग्रामस्तरावरील नियोजन प्रक्रियेसाठी प्रत्येक ग्रामपंचायतीस ४ ते ५ दिवस कालावधी लागणार असून त्यासाठी आपल्या व तालुका स्तरावरून अत्यंत काटेकोरपणे नियोजन करावे लागणार आहे. आपल्या जिल्ह्यातील उपलब्ध प्रभारी अधिकारी, प्रविण प्रशिक्षक व गणातील ग्रामपंचायती/महसूली गावांची संख्या, उपलब्ध होणारे मनुष्यबळ आणि प्रक्रियेसाठी उपलब्ध असलेला मर्यादीत वेळ या सर्व बाबी विचारात घेऊन या कार्यक्रमाचे परिपूर्ण नियोजन करावे.

५. वरील प्रमाणे आपल्या जिल्ह्यातील प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रमांचे नियोजन करून यशदा, पुणे व या कार्यालयास दिनांक २० मे, २०१६ पर्यंत अवगत करावे. या कार्यालयाकडून उपक्रम/कार्यशाळा निहाय निधीचे नियोजन

---

सोबत जोडलेले आहे. त्यानुसार आपल्या जिल्ह्यास या कार्यालयाकडून स्वतंत्रपणे निधी वितरीत करणेत येईल. आपल्या जिल्ह्यास निधी उपलब्ध झाल्यानंतरच वर नमुद प्रशिक्षण व क्षमता बांधणी कार्यक्रमांना सूरूवात करावयाची आहे.

६. या सर्व स्तरावरील प्रशिक्षण व क्षमता बांधणीसाठी आवश्यक लागणारे वाचन साहित्य व प्रपत्रे, प्रशिक्षणाची विषयपत्रिका, प्रमुख प्रविण प्रशिक्षक व प्रशिक्षणाचे आदर्श सादरीकरण (Standard PPT) इ. राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे यांचेकडून उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यानुसार आपण यशदाशी संपर्क साधून प्रशिक्षण साहित्य व आवश्यक बाबी प्राप्त करून घ्यावयाच्या आहेत.

o/c

**राज्य प्रकल्प संचालक**
रा.प्र.व्य.कक्ष, रा.गां.पं.स.अ.
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत :**

१) मा.प्रधान सचिव, (ग्राम विकास व पंचायतराज), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई - ४००००१ यांना माहितीस्तव सादर
२) संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे यांना आवश्यक कार्यवाहीसाठी
३) उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे, नाशिक, कोकण, औरंगाबाद, अमरावती, नागपूर विभाग यांना माहितीस्तव व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
४) विभागीय प्रकल्प उप संचालक, रा.गां.पं.स.अ.कक्ष, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे, नाशिक, कोकण, औरंगाबाद, अमरावती, नागपूर विभाग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी